ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# मध्य आशियाचा इतिहासाबद्दल राहूल सांकृत्यायन यांनी केलेले इतिहास विश्लेषण

**प्रा. डॉ. जगदीश घनशाम खरात**
विभाग प्रमुख, इतिहास विभाग,
धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, जि. जळगांव

★★★

Abstract : महापंडित राहूल सांकृत्यायन यांचा जन्म 1 एप्रिल 1893 साली उत्तर प्रदेशातील पन्दहा, जिल्हा आजमगढ येथे झाला. त्यांचे मूळ नाव केदारनाथ पांडे असे होते. बौद्ध धर्म स्विकारल्यापासून त्यांनी राहूल सांकृत्यायन हे नाव धारण केले. सांकृत्यायन एक प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्व होते. त्यांनी जी विविध क्षेत्रामध्ये प्रगती केली याचा मुलाधार म्हणजे त्यांची इतिहा दृष्टी होती. सांकृत्यायन यांनी मध्य आशियाचा इतिहास, अकबर, ऋग्वैदिक आर्य, मानव समाज, वोल्गा ते गंगा, इस्लामधर्मचीी रूपरेशा, तिबेटमध्ये बौद्ध धर्म इल्पही एतिहासीक ग्रंथ आपणास त्यांच्या इतिहास दृष्टीची साक्ष देतात.

सांकृत्यायन यांनी मध्य आशियाचा इतिहास हा एक असाच महत्वपूर्ण ग्रंथ लिहीला आहे. त्यात ते म्हणतात की, मध्य आशियाचा आपल्या इतिहासाशी खुप जवळचा संबंध आहे. ग्रीकांनी सुद्धा भारताच्या काही भागावर राज्य केले, शक, कुशाण मध्य आशियातून आले. या शासकांचा आणि राज्यकर्त्यांचा व त्यांच्या जातींच्या इतिहासाचा एक भाग मध्य आशियात आहे. त्यामुळे मध्य आशियाच्या इतिहास आपण समजुन घ्यावयास हवा असे सांकृत्यायन यांनी स्पष्ट केले आहे.

Keyword : तुर्क, मोगल, मध्य आशिया, ताम्रयुग, पितळयुग, दासप्रथा, संरजामशाही, साम्यवादी क्रांती, खलीफा, सेल्जुक, मंगोल, चगताई, द्वंदात्मक इतिहास, झारशाही, बोनान, मिथ्रोडेटस.

Methodology : सदरच्या संशोधनात राहूल सांकृत्यायन यांच्या मध्य आशियाच्या इतिहासाबद्दल अभ्यास केला आहे. व्यष्टी अध्ययन पद्धतीतुन याविषयी मांडणी केली आहे. एकुणच सदरील संशोधनाकरिता आंतरविद्याशाखीय अर्थात एकीकृत संशोधन पद्धतीचाच वापर केला आहे. प्रस्तुत संशोधनाद्वारे मध्य आशियाच्या इतिहासावर सांकृत्यायन यांनी कसा प्रकाश टाकला आहे याची साधक–बाधक चर्चा केली आहे.

Introduction : महापंडीत राहूल सांकृत्यायन व्यक्तित्व व कृतीत्व दोन्ही दृष्टीने श्रेष्ठ व्यक्ती होते. त्यांचा जन्म 1 एप्रिल 1893 साली पंदहा, जिल्हा आजमगढ, उत्तरप्रदेश राज्यात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण उर्दु माध्यमातून झाले. इ.स. 1910 साली सांकृत्यायन संन्यस्त वृतीकडे आकृष्ट झाले. त्याचे मुळ नाव केदारनाथ पांडे असे होते. बौद्ध धर्म स्विकारल्यापासून त्यांनी राहूल सांकृत्यान हे नाव धारण केले व तेव्हापासून ते या नावाने परिचित आहेत. राहुल सांकत्यायन एक प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्व होते, त्यांनी जी विविध क्षेत्रांमध्ये प्रगति केली त्याचा मुलाधार म्हणजे त्यांची इतिहासदृष्टी होती. सांकृत्यायन बहुभाशिक असल्यामुळे त्यांच्या इतिहासदृष्टीला आणखी प्रखरता प्राप्त झाली. तसेच त्यांना जवळपास छत्तीस भाशांचे ज्ञान होते. त्यांना हे भाशा ज्ञान देश–विदेशातील एतिहासीक स्त्रोतांचे अभ्यासासाठी अत्यंत उपयोगी ठरले. मध्य आशियाचा इतिहास, अकबर, ऋग्वैदिक आर्य, मानव समाज, वोल्गा ते गंगा, इस्लाम धर्माची रूपरेखा, तिबेट मध्ये बौद्ध धर्म इत्यादी एतिहासीक ग्रंथ आपणास त्यांच्या इतिहास दृष्टीची साक्ष देतात. सांकृत्यायन भुतकाळाला उघड्या डोळ्याने पहाणे आणि त्याचे स्पष्ट चित्र आपल्या समोर उभे करणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यांनी तिबेटहून आणलेल्या बहुमुल्य ग्रंथांचा अभ्यास करून बुद्ध धर्माचा इतिहास आपल्यासमोर उभा केला. तसेच पुरातत्वीक अभिलेख, विटा, नाणी इत्यादींचे सुक्ष्म अवलोकन करून इ.स. पुर्व हजारो वर्षांच्या भारत–आशियाच्या भव्य इतिहासाची इमारत उभी केली. मानव जातीचा इतिहास सुद्धा त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला.

सांकृत्यायन मध्य आशियाबद्दल टिप्पणी करतांनी म्हणतात की, आधुनिक एतिहासीक घटनांकडे पाहत असतांना त्या मागची इतिहासाबद्दलची पार्श्वभूमी देखील आपण पाहिली पाहिजे. या पद्धतीने विचार करत असतांना मला कळले की मध्य आशियाच्या इतिहासाचा आमच्या इतिहासाशी खुप घनिष्ठ संबंध आहे. आर्याप्रमाणेच ग्रीक लोकांनी सुद्धा भारताच्या काही भागावर राज्य केले. शक, कुशाण तेथूनच आले. एवढेच नव्हे तर हुण, तुर्क, मोगल सुद्धा मध्य आशियातून भारतात आले. या शासकांचा आणि राज्यकर्त्यांचा व त्यांच्या जातींच्या इतिहासाचा एक भाग मध्य आशियात आहे, जो आपण माहित केल्याशिवाय इतिहास समजून घेऊ शकणार नाही. त्यामुळेच मला मध्य आशियाचा इतिहास लिहीण्याची प्रेरणा मिळाली.

सांकृत्यायन मध्य आशियाच्या इतिहासात मानवी कार्याचा इतिहास आपल्यासमोर मांडतातच पण त्याच बरोबर मानवाचा उद्भव व विकास यावरदेखील प्रकाश टाकतात. ह्याच क्रमाने लोह युगापासून आदिमानव ते आजच्या मानवाचा विकास, वैज्ञानिक व पुरातात्वीक पुराव्यांच्या आधारे या ग्रंथात मांडलेला आहे. सांकृत्यायन ताम्रयुग व पितळयुगाबद्दल असे वक्तव्य करतात की, जगात विभिन्न देशामध्ये ताम्रयुग व पितळ युगामध्ये अंतर आहे. जसे की, मध्य आशियामध्ये

2500 ते 1500 इ.स. पूर्व पर्यंत ताम्रयुग होते आणि 1500 ते 600 इ.स.पुर्व पर्यंत पितळ युग होते. युरोपियन देशांमध्ये पितळ युग अधिक लवकर आले होते. याचे कारण सांगत असतांना ते म्हणतात की, काकेशष, चकोस्लोव्हाकिया, स्पेन इ. प्रदेशात टिन तसेच तांबे या धातुच्या खाणी आहेत. ताम्रयुगीन लोकांनी टिन हा धातु तांब्यासोबत मिसळल्यापासून त्यांना पितळ या नव्या धातुचा शोध लागला. कथील हा धातु मेसोपोटेमिया आणि इतर देशांत सहजपणे उपलब्ध नवह्ता म्हणून येथे जास्त वेळपर्यंत ताम्रयुग होते.

ताम्रयुगाचे विवेचन सांकृत्यायन यांनी वैज्ञानिक समाजवादी दृष्टीकोनाने केले आहे. त्यांच्या मते एकीकडे या युगाने उदयोग व व्यापारात भरभराट आणली तसेच शेती व पशुपालनामुळे लोकांकडे संपत्ती आली. पण त्यामुळे समाजात दास प्रथेला सुरुवात झाली. तसेच समाजात संरजामशाही प्रस्थापित झाली.

सांकृत्यायन यांचा उपरोक्त ग्रंथ मध्य आशियाचा इतिहास दोन खंडात आहे. त्यात प्रागैतिहासीत काळापासून ते रशियातील साम्यवादी क्रांती (इ.स. 1917–1929) पर्यंतच्या काळाचे विस्तश्त विवरण त्यांनी यात मांडले आहे. पहिल्या खंडात षक, हुण, तुर्क, ग्रीक, अरब, उमैया, अब्बासी (खलीफा), गजनवी, सेल्जुक, घोरी, ख्वारेज्मी, मंगोल, चिनी, मुस्लिम, चगताई, बौद्ध, रशियन तथा तैमुर इ. कित्येक वंश व जातींचा द्वंदात्मक इतिहास रेखांकित केलेला आहे. तर दुसऱ्या खंडात पुढीलप्रमाणे इतिहास कालखंड व त्यांची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक मांडणी केली आहे. ती पुढीलप्रमाणे–

1) चीनमध्ये मंगोल वंश (इ.स. 1200–1368)
2) रशियातील रूरिक वंष (इ.स. 911–1594)
3) चगताई, हुलाकू व तैमुर वंश
4) रशियाचा प्रसार (इ.स. 1598–1801)
5) रशियातील झारशाही (इ.स. 1801–1917)
6) रशियन साम्यवादी क्रांती (इ.स. 1917–1929)

ह्या सर्व गोष्टींचे / घटनांचे त्यांनी विस्तश्त विवेचन केले आहे. अशा प्रकारे सांकृत्यायन यांनी मध्य आशियाचा इतिहास या ग्रंथात मुलत राजकीय व आर्थिक दृष्टीकोन मांडत असतांना समयोचितपणे सामाजिक व सांस्कृतिक बाजुने सुद्धा लिखाण केल्याचे दिसते. सांकृत्यायन यांनी चीन, इराण ह्या देशांचा तत्कालीन इतिहास (इ.स. 910–1594) इथे मांडलेले आहे. कारण मध्य आशियाचे पुर्ण चित्र किंवा दृष्य चीन, ईराण आणि रशिया यांच्यातील परस्पर आंतरसंबंधातील संवादाचा परिणाम होय असे ते म्हणतात.ज्या इंडो–ग्रिक, शक तसेच हुण जमातींनी इ.स. पुर्व पहिल्या शतकात भारतीय इतिहासाला प्रभावित केले, ह्यांचा उगम, विकास आणि ह्या जमातींचा विभिन्न शाखा भारतात कशा पोहोचल्या याचे विस्तृत वर्णन केले आहे.

मध्य आशियातच चिनी भिंतीच्या एतिहासिकतेबद्दल ते म्हणतात की, चिमधील पहिला एतिहासीक राजवंश चिन याचा संस्थापक चिन–शी–होआंगती (225–206 इ.स.पुर्व) याने हुण आक्रमणापासून चिनचे संरक्षण करण्यासाठी चिनची भिंत बांधली आणि चिनमध्ये घुसलेल्या हुणांना उत्तरेकडे पळवून लावले." असा उपाय इतर राज्यकर्त्यांनी केला नाही असे इतिहासकार रामशरण शर्मा म्हणतात.

इ.स. पुर्व 176 साली चिनने हुणांना पळविल्यामुळे ते पश्चिमेकडे गेले. शक भारतात पण आले होते. त्यांच्याविषयी सांकृत्यायन म्हणतात की, 115 इ.स. पुर्व साली शकांच्या टोळ्या बलूचिस्तान व सिंध प्रांताकडे पळाल्या. येथे त्यांनी आपले षासन प्रस्थापित केले. शकांनी सिंधपासून सौराष्ट्र, अवंती व मथुरापर्यंत आपला राज्यविस्तार केला आणि त्यांनी क्षहरात वंशी आपला नेता मोग (77–58 इ.स.पुर्व) याच्या नेतृत्वाखाली इ.स. पुर्व 77 च्या आसपास गंधार पासून कपिशा (सध्या अफगणिस्तान पर्यंत आपले साम्राज्य नेले) मोग याने सिंध प्रांताच्या उत्तरेकडे कुच करून गंधार (तक्षशिला) जिंकून त्याला आपल्या राजधानीचे ठिकाण बनविले.

अधिकांश इतिहासकारांनी प्रथम 'शक' शासकाचे नाव 'मावेज' आहे असे मत मान्य केले आहे. महान पुरातत्वज्ञ मार्शल सुद्धा स्वीकार करतात की, प्रथम शक शासक 'मावेज' हाच होता. मावेज हाच मोग होय व तो इ.स. पुर्व 78 साली राज्य करत होता. सांकृत्यायन यांच्या मताची पुष्टी तक्षशिला येथे जो साम्रपट सापडला आहे त्याद्वारे होते.

शकांच्या बरोबरच पल्लवांचे सुद्धा त्यांनी विस्तृत वर्णन केले आहे. बहुतेक भारतीय इतिहासकार इराणच्या पार्थिव राजवंशापासून अपरिचित असल्यामुळे बोनान किंवा बोनानी यास पहिला पल्लव राजा मानतता. सांकृत्यायन म्हणतात की, "पल्लवांनी इराणवर 249 ते 226 इ.स. पुर्व पर्यंत राज्य केले. यांच्या एकूण शासकांची संख्या एकोणतीस होती. " ह्याचक्रमाने मांडणी करत ते सांगतात की बोनान किंवा बनाना सोळावा हा पार्शियन राजा मिथ्रदत्त प्रथम ह्याच्या काळात पार्शियनांनी परमोच्च विकास केला. बोनान याने इ.स. 7 ते इ.स. 16 पर्यंत राज्य केले."8 प्रो. झा. व श्रीमाळी सुद्धा बोनान ह्याच्याएवजी पल्लवांचा खरा संस्थापक मिथ्रोडेटस प्रथम किंवा मिथ्रदत्त ह्यास मानतात. त्यामुळे सांकृत्यायन यांनी मांडलेल्या वरील मांडणीची पुष्टी होते.

सांकृत्यायन पुढे भारतात कुशाण साम्राज्याची झालेली स्थापना, कुजुल कदफिसिज, विम कदफिसिज व कनिष्क यांच्या अधिन कुशाण साम्राज्याच्या प्रसारावर मध्य आशियाच्या इतिहासामध्ये प्रकाश टाकला आहे. सांस्कृतिक अंगाने सुद्धा कुशाण काळाचे त्यांनी वर्णन केले आहे. सांकृत्यायन म्हणतात, "कुशाणांच्या अगोदर ग्रीक लोकांनी कला व स्थापत्यास मोठे प्रोत्साहन दिले, परंतु ग्रीक कला तोपर्यंत एकरूप झाली नाही तो पर्यंत कनिष्कच्या शासन व्यवस्थेने तशाप्रकारे वाव दिला. गौतम बुद्धांची पहिली मुर्ती कनिष्काच्या काळातच बनविली गेली. ग्रीक कलेला भारतीय गांधार शैलीत परिवर्तीत करण्याचे काम सुद्धा कनिष्कानेच केले.

अशा प्रकारे सांकृत्यान यांनी शक, पल्लव, कुशाण इत्यादींविषयी मध्य आशियाच्या विशेष संदर्भात विस्तृत अशी माहिती विविध चिनी भाषेतील ग्रंथ, नाणी, इत्यादींच्या द्वारे आपल्यासमोर मांडणी केलेली आहे.

**संदर्भ –**


1. *सांकृत्यायन राहूल, जय यौधेय, किताब महल, अलाहाबाद, 19546, पृ*
2. *सांकृत्यायन राहूल, मध्य एशिया का इतिहास, खंड–2, बिहार राष्ट्रभाषा परिशद, पटना, 1957, पृ71.*
3. *सांकृत्यायन राहूल, जय यौधेय, पुर्वोक्त, पृ 8.*
4. *शर्मा रामशरण, प्राचीन भारत, एनसीईआरटी, दिल्ली, 1991, पृ. 144.*
5. *कित्ता, पृ 189.*
6. *पांडे विमलचन्द्र, प्राचीन भारत का राजनितीक एवं सांस्कृतिक इतिहास, सेंट्रल पब्लिशिंग, हाऊस, इलाहाबाद–1993, पृ 191.*
7. *सांकृत्यायन राहुल, जय यौधेय, पुर्वोक्त, पृ 191.*

*8. कित्ता, पृ 191.*

9. *झा एवंम श्रीमाली, प्राचीन भारत का इतिहास, दिल्ली विश्वविद्यालय प्रकाशन, दिल्ली, 2002, पृ 227.*
10. *सांकृत्यायन राहुल, जय यौधेय, पुर्वोक्त, पृ 203.*